G65/C8A/BTX101/EE/20160518

वेळ : 3 तास **गुण : 80**

सर्वसाधारण सूचना :

1. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2. प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3. प्रत्येक उप-प्रश्नांचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
4. 80 गुणांच्या प्रश्नपत्रिकेचे आपल्या शिक्षणक्रमाच्या संरचनेनुसार गुणांत रूपांतर करण्यात येईल.

---

1. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

   a) वाचन म्हणजे काय ? वाचनाचे कोणतेही चार फायदे लिहा. 5

   b) वाचनामागील कोणत्याही पाच प्रेरणा लिहा. 5

   c) श्रवण-कौशल्य म्हणजे काय ? श्रवण प्रक्रियेतील प्रमुख चार अडथळे लिहा. 5

   d) भाषणाचा आराखडा तयार करतांना कोणत्या गोष्टींची जाणीव ठेवली पाहिजे ? ते सविस्तर लिहा. 5

   e) निरिक्षण म्हणजे काय ? निरिक्षणाचे प्रमुख फायदे कोणते ? ते लिहा. 5

2. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

   a) प्रकट वाचन आणि मूक वाचन यांच्यातील साम्य-भेद स्पष्ट करा. 5

   b) एखाद्या विषयाचे आकलन झाले आहे किंवा नाही हे आपण कसे ठरवाल ? सविस्तर लिहा. 5

   c) निरीक्षण कौशल्यात प्रमुख भूमिका कोणत्या ज्ञानेंद्रियांची असते ? ते उदाहरणासह स्पष्ट करा. 5

   d) ग्रंथालय म्हणजे काय ? ग्रंथालयाचे प्रमुख चार विभाग कोणते ? 5

   e) श्रोत्यांसमोर परिणामकारक बोलण्यासाठी कोणते घटक महत्त्वाचे आहेत ? ते लिहा. 5

3. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

   a) सुलेखन म्हणजे काय ? सुलेखनाची मुख्य वैशिष्ट्ये कोणती ? ते लिहा. 5

   b) लेखन समीक्षा म्हणजे काय ? आपल्या वाचनातुन गेलेल्या एखाद्या उदाहरणाचा परिचय करून स्पष्ट करा. 5

   c) शोक प्रदर्शनासाठी जमलेल्या समूहात संवाद साधतांना कोणती पथ्ये पाळाल ? ते लिहा. 5

   d) सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे काय ? सार्वजनिक ग्रंथालयांची कार्ये व सेवा याविषयी माहिती लिहा. 5

   e) ग्रंथालयात ग्रंथ कसे ठेवलेले असतात ? थोडक्यात माहिती लिहा. 5

4. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

a) चांगल्या टिप्पण्यांची वैशिष्ट्ये सांगून, टिप्पणी लेखन करतांना कोणती काळजी घ्यावी ? ते लिहा. 5

b) निबंध लेखनाचे स्वरूप स्पष्ट करून, निबंध लेखनाची तंत्रे कोणती ? ते लिहा. 5

c) श्रवण-कौशल्यांच्या साहाय्याने ज्ञान मिळविण्याला कोणत्या प्रकारे मदत होऊ शकते ? 5

d) मराठी भाषेत शब्दांच्या जाती किती आणि कोणत्या ? त्या सविस्तर लिहा. 5

e) संदर्भ ग्रंथ म्हणजे काय ? संदर्भ ग्रंथांचे प्रकार स्पष्ट करा. 5

✦✦✦✦✦✦✦